महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००01.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल: cetcell@mahacet.org


क्र.आस्था-१९१९/प्र.क्र.६१/हाऊसकीपिंग सर्व्हिसेस/सेवापूरवठादार Extention २/891/२०२६ दिनांक 02 APR 2026

प्रति,

..........

..........

..........

विषय - राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण या दोन कार्यालयाच्या हाऊसकीपिंग सर्व्हिसेस संदर्भात खुल्या बाजारातून दरपत्रके मागवून सेवापुरवठादार निश्चित करण्याबाबत.

संदर्भ १ या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था-१९१९/ प्र.क्र.६१/ हाऊसकिपिंग सर्व्हिसेस/ सेवापुरवठादार Extention १/७७६/२०२६ दिनांक २३/०३/२०२६

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण या दोन्ही कार्यालयाच्या हाऊसकीपिंग सर्व्हिसेस संदर्भात खुल्या बाजारातून दरपत्रके मागवून सेवापुरवठादार निश्चित करण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये दिनांक २३/०३/२०२६ ते दिनांक २७/०३/२०२६ रोजी पर्यंत प्रथत मुदतवाढ देण्यात आली होती.

सद्यस्थितीत दोन सेवापुरवठादारांचे दरपत्रक सीईटी कक्षास प्राप्त झाले असून दिनांक ०२/०४/२०२६ ते दिनांक १०/४/१०१६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत दरपत्रके मागविण्यास दुसरी मुदतवाढ देण्यात येत आहे. सेवा पुरवठादारांनी दरपत्रकामधील दर अंकी व अक्षरी लिहिणे आवश्यक आहे.

किमान दरपत्रकाचे दर स्विकृत करण्यात येतील. तथापि सर्व /कोणतेही दरपत्रक अस्विकृत करण्याचे अधिकार आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे राहतील.

02/04/2026

प्रशासकीय अधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत- संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या दरपत्रकाचा मागविण्याचा मसुदा

महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:maharashtra.cetcell@gmail.com


निविदा क्र.१/क्र.आस्था-१९२६/ प्र.क्र.८/हाऊसकीपिंग सर्व्हिसेस/ Extention २/४९५/२०२६ दिनांक - 2 APR 2026

**बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकडून साफसफाई (HOUSEKEEPING) च्या कामासाठी निविदा/दरपत्रक मागविणेबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष ८ व ९ वा मजला, न्यु-एक्सलसीअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई या दोन्ही कार्यालयाच्या स्वत:च्या जागेच्या साफसफाईसाठी (HOUSEKEEPING) नोंदणीकृत बाह्ययंत्रणा संस्थांकडून अकरा महिन्यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी निविदा दरपत्रक मागण्यात येत आहेत.

निविदा/दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल, बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांकरिता तसेच आवश्यक अटी, शर्ती इ. विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

## A. पक्षकार :-

१. करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे) आणि प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई राहतील.

## B. साफसफाई (Housekeeping) ची सेवा देणाऱ्या संस्थेसाठी अटी व शर्ती :-

१. कंत्राटदार कार्यालयांच्या दैनंदिन साफसफाईसाठी दोन्ही कार्यालयासाठी प्रत्येकी १ प्रमाणे एकूण २ कर्मचारी पुरवतील व त्यांच्या मदतीने परिशिष्ट -१ मध्ये नमुद केल्यानुसार साफसफाईचे काम करुन घेतील.

२. कंत्राटदारास सफाईगार कर्मचाऱ्यास किमान वेतन अधिनियम, १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहिल.

३. उदयोग ऊर्जा कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दिनांक २४/०७/२०१९ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार विशेष/महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा. भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना/व्यावसायिक कर/बोनस/कामगार कल्यान निधी या दायित्वांचा समावेश करुन एकूण किमान व वेतन व भत्ते परिगणित करण्यात आलेले आहे. त्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन व अनुषंगिक भत्ते प्रदान करणे तसेच नियमातील तरतूदीनुसार त्याबाबतची दायित्वे संबंधित प्राधिकरणाकडे भरणे बंधनकारक राहिल.

४. राज्य सरकारने वेळोवेळी प्रस्तुत केलेला राज्य कर (दर) अधिसूचना तसेच केंद्र सरकारने वेळोवेळी प्रस्तुत केलेला केंद्रीय कर (दर) अधिसूचना याप्रमाणे लागू असलेला कर, परिपत्रक, शासन निर्णय, स्पष्टिकरण सेवा कराची विहित दरानुसार आकारणी करण्यात येईल.

b) व्यापारी लिफाफा

१. प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयामध्ये प्रत्येकी १ पूरुष अशा एकूण २ पदांसाठी किमान वेतन अधिनियम, १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहिल.

२. उदयोग उर्जा कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दिनांक २४/०७/२०१९ नुसार व किमान वेतन अधिनियमातील तरतूदीनुसार द्यावयाच्या मासिक पारिश्रमिक रक्कम दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावी. याबाबतचा सविस्तर तपशिल कंत्राट मान्य झाल्यानंतर कंत्राटदाराकडून कार्यालयास सादर करावा.

३. कंत्राटदाराने/पुरवठादाराने/निविदाकाराने वरील किमान वेतनानुसार मासिक पारिश्रमिक दर अदा करावे.

४. कंत्राटदार/पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही.

## D. बीड निविदा छाननीबाबत :-

१. कंत्राटदाराने/पुरवठादाराने नमूद केलेले दर हे बीड उघडण्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध/विधीग्राह्य असतील.

२. बीड शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक बीड मध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील.

३. तांत्रिक बीड उघडल्यानंतर दरासंबंधिचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकांचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध बीड असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे/ पुरवठादाराचे न्यूनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील. शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले कर तुलना करताना विचारात घेण्यात येतील. त्यानंतर न्युनतम ठरलेल्या दरपत्रकाच्या आधारे दर स्विकृत करण्यात येतील.

४. प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.

५. शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार बीड छाननीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडे राखुन ठेवण्यात येतील. सदर निर्णय कंत्राटदारावर/ पुरवठादारावर यांना मान्य करणे बंधनकारक राहिल.

## E. पात्र निविदाकाराने/पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत :-

१. उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/ उद्योग-४, दिनांक ०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्र.४/अ.क्र.४.६ मधील तरतुदीनुसार निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास/पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसांच्या आत सुरक्षा ठेव अनामत (Performance Security Deposit) **Earnest Money Deposit (Refundable) EMD/ Security deposit of form of Bank Guarantee/ DD - ३ % of Total Amount of Tender** या कार्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण ,मुंबई यांचे नावाने ((In favour of Secretary Admission Regulating Authority Mumbai payable at Mumbai) देण्यात यावा. व आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई (In favour of COMMISSIONER STATE COMMON ENTRANCE TEST CELL, Mumbai payable at Mumbai) यांचे

६. कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास दिलेल्या पारिश्रमिकांच्या/इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकित प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला/ पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.

७. कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील.

८. कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करुन संबंधित प्राधिकरणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडून ज्यादा रक्कम घेतल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे पुरावे आढळल्यास संबंधित कंत्राटदार/ पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल.

९. कंत्राटदारास/पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/वस्तू व सेवाकराची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. वस्तू व सेवा कर (GST) २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायद्याअंतर्गत अधिसूचना क्र. ५०/२०१८ मधील तरतूदीनुसार वस्तू विषयक एका संविदाखालील मूल्य रु.२,५०,०००/- पेक्षा अधिक असेल अशा करपात्र वस्तु किंवा सेवा यांच्या पुरवठयासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या रक्कमेतून विहित दरानुसार कपात करण्याची लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासनाकडून वेळोवेळी लागु करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

१०. व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांची राहील.

११. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८, दि.२२/०२/२०१९ नुसार कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करण्यासंबंधिच्या "जोडपत्र-अ" मधील तरतूदी कंत्राटदारास/पुरवठादारास/निविदाकारास बंधनकारक राहतील (प्रत संलग्न).

१२. लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत कंत्राटदारास मासिक परिश्रमिकाची अदायगी होणार असल्यामुळे दायित्व नियमातील तरतूदीनूसार जमा केले जात असल्याबाबतची खातरजमा त्यांचे स्तरावरून करणे आवश्यक राहील. करारनामा समाप्त झाल्यानंतर कंत्राटदारास सुरक्षा ठेव अनामत अदा करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडे सादर केल्यानंतर अनामत रक्कम अदा करण्याबाबतचे आदेश संबंधितांकडून निर्गमित करण्यात येतील.

वर नमूद अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या बाह्ययंत्रणेच्या संस्थाकडून प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयांच्या स्वत:च्या जागेची दैनंदिन साफसफाईसाठी (Housekeeping) प्रत्येकी १ पुरुष कर्मचारी एकुण २ कर्मचारी १२ महिन्यांकरीता सेवा घेण्यासाठी निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तसेच संबंधित कंत्राटदाराच्या समाधानकारक कामगिरीच्या अधीन राहून परस्पर संमतीने त्यांना दोन वर्षांसाठी त्याच दराने मुदतवाढ दिली जाऊ शकते.

**प्रशासकीय अधिकारी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

ठिकाण : मुंबई
दिनांक :